# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ०६ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं. २१** **विषय क्रमांक - २१**

दिनांक : २३/०२/२०२४ विभाग : शहर अभियंता.

| | |
|---|---|
| विषय क्रमांक - २१<br>दिनांक<br>२३/०२/२०२४ | नागरी दलितेतर वस्ती सुधार योजने अंतर्ग त व्याजाचे रक्कमेतुन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस सादर करणेबाबत... |
| ठराव क्रमांक - २१<br>दिनांक<br>२३/०२/२०२४ | वरिल विषयांकीत अहमदनगर महानगरपालिकेकडे खालील यादीतील नागरिकांनी अर्ज देवून रस्ते व गटर व्यवस्था करुन देणेबाबत मागणी केलेली आहे. त्यानुसार सदर ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करुन रक्कम रु.१,४२,४१,०७२/- खर्चाची अंदाजपत्रके तयार करण्यांत आलेली आहेत.<br>नागरी दलितेतर वस्ती सुधारणा योजना २०२३-२०२४ अंतर्गत या विभगाकडून यापुर्वीच मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस प्रस्ताव मंजूरीसाठी दाखल करण्यांत आलेला आहे. त्यामुळे सदर कामासाठी सदर योजनेतुन मनपास प्राप्त झालेल्या निधीवरील रक्कम रु.१,४२,४१,०७५/- इतके व्याज उपलब्ध आहे. सदर व्याजाच्या रक्कमेतुन प्रस्ताव सादर करणेबाबत मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी सुचित केले आहे.<br>शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण ३४१६/प्र.क्र.४०/नवि-०४ दि.१४ सप्टेंबर, २०२० शासन परिपत्रकानुसार विविध योजनांमध्ये मंजूर करण्यांत येणा-या निधीवरील प्राप्त होणा-या व्याजाची रक्कम त्या त्या योजनेसाठीच संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना वापरण्यास मुभा राहील. त्यासाठी त्यांना मुळ योजनेबाबतची सर्व मार्गदर्शक तत्वे लागू राहतील. त्याचप्रमाणे मूळ योजनेतील निधीकरीता लागू असलेल्या सक्षम प्राधिका-या कडून प्रशासकीय मान्यता घेणे देखील बंधनकारक राहील. |

| अ.क्रं. | कामाचे नाव | तांत्रिक मान्यता रक्कम |
|---|---|---|
| ०१ | प्र.क्र.०२ श्रीकृष्णनगर मधील गोरे घर ते ढोले घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | १९,९९,७२२/- |
| ०२ | प्र.क्र.०२ डोकेनगर मधील वेदांत रेसिडेन्सी ते नारद घर ते पडगळमल घरापर्यंत ३०० एम.एम.आर.सी.सी. पाईप गटर व्यवस्था करणे | २०,८६,८८०/- |
| ०३ | प्र.क्र.०२ मधील स.नं.४४/१/२, गुरुकुल सोसायटी येथे ओपनस्पेसला कंम्पौंड बांधणे. | ९,९७,७५०/- |

<table>
<tr>
<td></td>
<td>
<table>
<tr><td>०४</td><td>प्र.क्र.०२ मधील ज्ञानेश्वर नगर येथे शेळके घर ते जगदाळे घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे.</td><td>११,५६,८८६/-</td></tr>
<tr><td>०५</td><td>प्र.क्र.०२ मधील सुर्यनगर भागात तपोवनरोड ते जरे घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे.</td><td>७९,९९,८३४/-</td></tr>
<tr><td></td><td>एकुण रक्कम रु.</td><td>१,४२,४१,०७२/-</td></tr>
</table>
तरी वर नमुद ०५ विकास कामांचा प्रस्ताव नागरी दलितेतर वस्ती सुधार योजनेत प्राप्त झालेल्या निधीवरील रक्कम रु.१,४२,४१,०७५/- (अक्षरी रक्कम रु.एक कोटी बेचाळीस लाख एक्केचाळीस हजार पंच्च्याहत्तर मात्र) या व्याजाचे रकमेतून मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करणेकामी मा.प्रशासक यांची मंजूरी देण्यांत येत आहे.
</td>
</tr>
<tr>
<td>निर्णय</td>
<td>महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.</td>
</tr>
</table>

सही/-
**(मेहेर लहारे)**
नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.

सही/-
**(डॉ.पंकज जावळे)**
प्रशासक
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ०६ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.२२** **विषय क्रमांक - २२**

दिनांक : २३/०२/२०२४ विभाग : बांधकाम विभाग.

<table>
<tr><td>विषय क्रमांक - २२<br>दिनांक<br>२३/०२/२०२४</td><td>मंत्री संदर्भ कक्षात प्राप्त झालेल्या मंत्री संदर्भावर तात्काळ कार्यवाही होणेबाबत अहमदनगर महानगरपालिकेच्या मुकुंदनगर येथील ओपन स्पेस विकसित करणेबाबतचे काम शासनाच्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) या योजनेतुन प्रस्तावित करणे बाबत...</td></tr>
<tr><td>ठराव क्रमांक - २२<br>दिनांक<br>२३/०२/२०२४</td><td>वरिल विषयांकीत खाली नमुद काम मंत्री संदर्भ अंतर्गत मनपा कडे पाठविण्यात आलेले आहे. त्यानुसार सदर कामाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यांत आले आहे. सदर काम इतर कोणत्याही योजनेतून प्रस्तावित करण्यांत आलेले नाही.<br><br><table><tr><th>अ.नं.</th><th>प्रस्तावित कामाचे नांव</th><th>अंदाजपत्रकीय खर्च</th></tr><tr><td>०१</td><td>मुकुंदनगर येथील ओपनस्पेस विकसित करणे</td><td>१,६३,५७,७२१/-</td></tr></table><br>सदर काम जिल्हा वार्षिक योजनेतून प्रस्तावित करणेकामी मा.महापौर मनपा, अहमदनगर यांना संदर्भ क्रं.२ अन्वये सुचित केले आहे. तथापि दि.२७/१२/२०२३ पर्यंत मा.महापौर, यांचेकडुन इकडील विभागाकडे उलटटपाली कळविणेत आलेले नाही. त्यामुळे सदर प्रस्तावाबाबत पुढील कार्यवाही करता आलेली नाही.<br>दि.२८/१२/२०२३ रोजी अहमदनगर महानगरपालिकेच्या सदस्यांची पंचवार्षिक मुदत संपुष्टात आलेली असल्याने सदर कामाबाबत मा.आयुक्त,मनपा,अहमदनगर यांचेकडेस जिल्हा वार्षिक योजना - सन२०२३-२०२४ अंतर्गत प्रस्तावित करणेकामी सविस्तर अहवाल सादर करणेची कार्यवाही करणेत येईल असे कळविण्यात आलेले आहे.<br>सदर काम जिल्हा वार्षिक योजना २०२३-२०२४ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) यामधुन प्रस्तावित करणेकामी प्रशासकीय ठराव करणे आवश्यक आहे. तथापि सदर योजनेतून २०२३-२०२४ साठीचा मंजूर नियतव्ययानुसार प्रकल्प अहवाल इकडील जा.क्र.सा.बां.४२०२ दि. १५/०१/२०२३ अन्वये मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस सादर करण्यात आलेला आहे. सदर बाब लक्षात घेता उक्त कामासाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देणे बाबतचा प्रस्ताव सादर करणे योग्य आहे.</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| | तरी उक्त कामाचा रक्कम रु.१,६३,५७,७२१/- (अक्षरी रक्कम रु.एक कोटी त्रेसष्ट लाख सत्तावन्न हजार सातशे एकवीस मात्र) खर्चाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर यांचेकडेस सादर करणेकामी मा.प्रशासक यांची मंजूरी देण्यांत येत आहे. |
| निर्णय | महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली. |

सही/-
**(मेहेर लहारे)**
नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.

सही/-
**(डॉ.पंकज जावळे)**
प्रशासक
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ०६ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं. २३** **विषय क्रमांक - २३**

दिनांक : २३/०२/२०२४ विभाग : अर्थ विभाग

| | |
|---|---|
| विषय क्रमांक - २३<br>दिनांक<br>२३/०२/२०२४ | अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रकल्प विभागाचे सन २०२३-२०२४ या वित्तीय वर्षात पुनर्विनियोजन अंदाजपत्रक करणे बाबत… |
| ठराव क्रमांक - २३<br>दिनांक<br>२३/०२/२०२४ | वरिल विषयांकीत अहमदनगर महानगरपालिकेच्या सावेडी स.न.२८९ या ठिकाणी स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत बांधकाम व पाडकाम (Construction & Demolition Waste) कच-यावर प्रक्रिया करण्याचा प्रकल्प उभारणे, चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे या कामासाठी खाजगी एजन्सीची नियुक्ती करणे बाबत Tender ID २०२२ ANMC ७५६१७७ १ अन्वये ई-निविदा मागविण्यांत आली होती. सदर प्रकल्प उभारणे करीता गुरु रामदास कंन्स्ट्रक्शन, नांदेड यांना कार्यारंभ आदेश देण्यांत आले असुन सदर प्रकल्पाचे काम सद्यस्थितीत प्रगतीत असुन टप्यात आहे.<br>सन २०२३-२०२४ च्या अंदाजपत्रकामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी या लेखाशिषका मध्ये १.०० कोटीची तरतुद करण्यात आली आह. सद्यस्थितीत सदर लेखाशिर्षकामधुन य कामाचे देयक क्र.१ रक्कम रु.७५,९४,९७९/- अदा करण्यात आले असुन रु.२४,०५,०२१/- इतकी तरतुद शिल्लक आहे. परंतु सदर कामापोटी एकुण रक्कम रु.४,७०,००,०००/- इतका खर्च अपेक्षित असल्याने स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी या लेखाशिर्षकामध्ये आणखी रु.४.०० कोटीची तरतुद करणे आवश्यक आहे.<br>प्रकल्प विभागाकडील सर्वासाठी घरे या लेखाशिर्षकामध्ये रु.३५.०० कोटीची तरतुद करण्यांत आली आहे. यापुर्वी अरोग्य विभागाचे पस्तावानुसार एमआरआय मशिन खरेदी करणेकामी उपरोक्त लेखाशिर्षकामधुन रु.३.७५ कोटी इतकी तरतुद वर्ग करणेत आली असून या अंतर्गत रु.३१.२५ कोटी इतकी तरतूद शिल्लक आहे. त्यामुळे विषयांकित कामासाठी स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी या लेखाशिर्षकाची तरतूद १.०० कोटी ऐवजी ५.०० कोटी इतकी करणेस हरकत नाही. त्याचा तपशिल खालील प्रमाणे. |

| अ. क्र. | लेखाशिर्षकाचे नांव | सन २०२३-२४ च्या अंदाज पत्रकातील मुळ तरतुद | झालेला खर्च | यापुर्वी वर्ग केलेली तरतुद | शिल्लक तरतुद | वर्ग करावयाची तरतूद | सुधारीत तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | सर्वांसाठी घरे | ३५.०० | ०.५४ | ३.७५ | ३०.७१ | ४.०० | २७.२५ |
| ०२ | स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी | १.०० | ०.७६ | ०.०० | ०.२४ | ४.०० | ५.०० |

| | |
|---|---|
| | <br>करीता सर्वांसाठी घरे या लेखाशिर्षकामधील रु.४.०० कोटीची तरतुद कमी करुन स्वच्छ महाराष्ट्र अभियान नागरी या लेखाशिर्षकामध्ये वर्ग करणेस मा.प्रशासकीय स्थायी समितीच्या कार्यसूची क्रमांक ५ प्रशासक ठराव क्र.३८ दिनांक २३/०२/२०२४ अन्वये मान्यता देण्यांत आलेली आहे. सदरच्या प्रशासकीय स्थायी समितीने शिफारस केलेल्या प्रस्तावास मा.प्रशासक महासभा यांची मंजूरी देण्यांत येत आहे. |
| निर्णय | महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली. |

सही/-
**(मेहेर लहारे)**
नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.

सही/-
**(डॉ.पंकज जावळे)**
प्रशासक
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ०६ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं. २४** | **विषय क्रमांक - २४**

दिनांक : २३/०२/२०२४ | विभाग : अर्थ विभाग

| | |
|---|---|
| विषय क्रमांक - २४ दिनांक २३/०२/२०२४ | अहमदनगर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाचे सन २०२३-२०२४ चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रक |
| ठराव क्रमांक - २४ दिनांक २३/०२/२०२४ | वरिल विषयांकीत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमियम रकमेतून कामे करणे "या लेखाशिर्षात रक्कम रु.२२.९३ कोटी इतकी तरतूद करण्यांत आलेली आहे. मात्र सदरची तरतूदीतून आज अखेर रक्कम रु.२२,८३,५९,७७०/- इतक्या रक्कमेचे प्रस्ताव खतविण्यात आलेले असुन रक्कम रु.१०,४०,२३०/- इतकी शिल्लक आहे. तथापि मनपा फंडातून निधी अभावी कामे करता येत नसल्याने त्यातच रस्ते खोदाई फि मधुन रस्ते करणे/दुरुस्ती" या लेखाशिर्षाअंतर्गत दुरसंचार कंपन्यांकडुन मिळणारी अपेक्षित रक्कम उपलब्ध होत नसल्याने विकास कामे करण्यास अडचणी येत आहेत. त्यामुळे नागरिकांच्या रोषास मनपास सामोरे जावे लागत आहे. याबाबत मा.आयुक्त तथा प्रशासक यांचेशी चर्चा केली असता त्यांनी या लेखाशिर्षातून रक्कम रु.४.०० कोटी कमी करुन "अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकपाटी प्रिमियम रकमेतून कामे करणे " या लेखाशिर्षात रक्कम रु.३.०० कोटी व "विकासभार" या लेखाशिर्षात रक्कम रु.१.०० कोटी वाढवून याबाबत नगररचना विभागाचा अभिप्राय घेवून अर्थसंकल्पाचे पुनर्विलोकन करणेचे सुचित केले आहे. त्यानुसार लेखाशिर्षातील कमी अधिक रक्कमेचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे. |

| अ.क्रं. | लेखाशिर्ष | २०२३-२४ ची मुळ तरतूद (लाखात) | यपूर्वीचा खर्च (लाखात) | शिल्लक (लाखात) (३-४) | प्रस्तावित केलेली वाढीव रक्कम (लाखात) | एकुण तरतूद (लाखात) (३+६) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ०१ | अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमियम रकमेतुन कामे करणे | २२९३.०० | २२८२.६० | १०.४० | ३००.०० | २५९३.०० |
| ०२ | विकासभार | ६००.०० | ५९९.७७ | ०.२३ | १००.०० | ७००.०० |

सदर तरतूदीमध्ये वाढ करणेसाठी खाली नमूद लेखाशिर्षातून चालू आर्थिक वर्षासाठी करण्यांत आलेली तरतूद कमी करणेस हरकत नाही.

| अ.क्रं. | लेखाशिर्ष | २०२३-२४ ची मुळ तरतूद (लाखात) | यपूर्वीचा खर्च (लाखात) | शिल्लक (लाखात) (३-४) | कमी करावयाची तरतूद रक्कम (लाखात) | सुधारीत तरतूद (लाखात) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| ०१ | रस्ते खोदाई फि मधुन रस्ते करणे / दुरुस्ती | १८५०.०० | १३२४.०६ | ५२५.९४ | ४००.०० | १४५०.०० |

तरी उक्तप्रमाणे "अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमियम रक्कमेतून कामे करणे" या लेखाशिर्षात रक्कम रु.३०० लक्षची व विकासभार या लेखाशिर्षात रक्कम रु.१००.०० लक्षची वाढीव तरतूद करणेकामी सदरचा प्रस्ताव मा.प्रशासकीय स्थायी समितीच्या कार्यसूची क्रमांक ५ प्रशासक ठराव क्र.३९ दिनांक २३/०२/२०२४ अन्वये मान्यता देण्यांत आलेली आहे. सदरच्या प्रशासकीय स्थायी समितीने शिफारस केलेल्या प्रस्तावास मा.प्रशासक महासभा यांची मंजूरी देण्यांत येत आहे.

| | |
|---|---|
| निर्णय | महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली. |

सही/-
**(मेहेर लहारे)**
नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.

सही/-
**(डॉ.पंकज जावळे)**
प्रशासक
अहमदनगर महानगरपालिका.
अहमदनगर ४१४००१.